**प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० या योजनेच्या अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा पाणलोट कक्ष व माहिती केंद्र (WCDC) या समितीमध्ये सुधारणा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्र: केंपुयो-२०२२/प्र.क्र.१५/जल-८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक : २७ सप्टेंबर, २०२४.**

वाचा :-

१) मृद व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. केंपुयो -२०२२/प्र.क्र.१५/जल-८, दि. २७ एप्रिल, २०२२
२) मृद व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. केंपुयो -२०२२/प्र.क्र.१५/जल-८, दि. ५ फेब्रुवारी, २०२४

## प्रस्तावना :-

राज्यात केंद्रिय भूसंसाधन विभाग, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० या योजनेच्या सामाईक मार्गदर्शक सूचना २०२१ निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार राज्यात प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० ही योजना राबविण्यास संदर्भ क्र.१ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली असून जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा पाणलोट कक्ष व माहिती केंद्र (WCDC) ही समिती गठीत करण्यात आली आहे. संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये सदर समितीचे सदस्य सचिव जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना करण्यात आले आहे.

२. मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.२३.७.२०२४ रोजी आयोजित विभागाच्या योजनांच्या आढावा बैठकीत झालेल्या चर्चेअंती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपरोक्त संदर्भ क्र.२ येथील दि.५ फेब्रुवारी, २०२४ रोजीचा शासन निर्णय रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० या योजनेच्या जिल्हा पाणलोट कक्ष व माहिती केंद्र (WCDC) समितीचे सदस्य सचिव जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना करणेबाबतचा संदर्भ क्र.२ अन्वये घेण्यात आलेला निर्णय या शासन निर्णयान्वये खालील अटींच्या अधीन राहून रद्द करण्यात येत आहे.

**(अ)** प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना२.० पाणलोट विकास घटक- या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता कृषी विभागाकडे सोपविण्यात आलेल्या कामांची “कार्यान्वयीन यंत्रणा” म्हणून कृषी विभाग काम करेल.

**(आ)** सदर योजनेमधील कृषी विभागाकडे दिलेल्या कामांची अंमलबजावणी, संनियंत्रण, गुणनियंत्रण, मूल्यमापन तसेच विविध स्त्रोतातून प्राप्त होणारा निधी प्रचलित कार्यपध्दतीनुसार खर्च करून कामे पूर्ण करण्याची जबाबदारी कृषी विभागाची राहील.

**(इ)** कृषी विभागाकडे दिलेल्या कामांच्या प्रगतीचा आढावा प्रधान सचिव (कृषी) व आयुक्त (कृषी) यांचे स्तरावर घेतला जाईल.

**(ई)** तसेच, सदर योजनेमधील सोपविण्यात आलेल्या कामांची “कार्यान्वयीन यंत्रणा” म्हणून काम करणाऱ्या वन, पाणी पुरवठा, ग्रामविकास (जिल्हा परिषद) इत्यादी विभागांना देखील उक्त अटी लागू आहेत.

२. उक्त योजना प्रामुख्याने मृद संधारणाशी निगडीत असून मृद संधारण हा विषय शासन कार्यनियमावलीतील अनुसूचीमध्ये मृद व जलसंधारण विभागाकडे सोपविण्यात आला आहे. तसेच प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना२.० पाणलोट विकास घटक- या योजनेचा मृद व जलसंधारण विभाग हा नोडल विभाग आहे.

त्यामुळे सदर योजनेच्या जिल्हास्तरीय जिल्हा पाणलोट कक्ष व माहिती केंद्र (WCDC) समितीचे सदस्य सचिव संदर्भ क्र.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग हे या शासन निर्णयाच्या दिनांकापासून असतील.

३. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी योजनांतर्गत काम करणाऱ्या सर्व कार्यान्वयीन यंत्रणांचा समन्वय करण्याचे काम जिल्हा पाणलोट कक्ष व माहिती केंद्र )WCDC( समितीचे सदस्य सचिव म्हणून जिल्हा जलसंधारण अधिकारी करतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेतांक २०२४०९२७१२४२४९२१२६ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by DEVENDRA PANDIT BHAMARE
Date: 2024.09.27 12:44:56 +05'30'

**( देवेंद्र भामरे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

२) मा. सभापती, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

३) मा. अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा. मंत्री, मृद व जलसंधारण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) मा. मंत्री, कृषी यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
११) सर्व सन्माननीय विधानपरिषद/विधानसभा सदस्य.
१२) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
१३) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
१४) महालेखापाल (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) - १/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
१५) सर्व विभागीय आयुक्त,
१६) आयुक्त (कृषी), पुणे.
१७) आयुक्त, मृद व जलसंधारण, छत्रपती संभाजीनगर.
१८) मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे.
१९) सर्व जिल्हाधिकारी,
२०) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
२१) प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालकपुणे ,महाराष्ट्र राज्य ,सामाजिक वनीकरण ,.
२२) महासंचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), छत्रपती संभाजीनगर.
२३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई (प्रसिद्धी करिता).
२४) आयुक्त, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
२५) आयुक्त, मनरेगा, नागपूर.
२६) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२७) संचालक, फलोत्पादन, पुणे.
२८) सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२९) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
३०) संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र, नागपूर.
३१) सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो),
३२) सर्व उपायुक्त (विकास),
३३) अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे,
३४) अपर आयुक्त ,(जलसंधारण)मृद व जलसंधारण विभाग, पुणेनागपूर / .
३५) सर्व प्रादेशिक जलसंधारण अधिकारी,
३६) सर्व जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग,
३७) सर्व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, कृषी विभाग,
३८) सर्व जिल्हा जलसंधारण अधिकारीलघुपाटबंधारे , (प.जि),
३९) सर्व उपसंचालकसामाजिक वनीकरण ,,
४०) सर्व उपवनसंरक्षकवन विभाग ,,

४१) सर्व जिल्हा विकास अधिकारी )NABARD),
४२) सर्व प्रकल्प संचालकजिल्हा ग्रा ,मीण विकास यंत्रणा,
४३) सर्व अशासकीय सदस्य, राज्यस्तरीय नोडल यंत्रणा (SLNA),
४४) वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे / छत्रपती संभाजीनगर,
४५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
४६) सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव, मृद व जलसंधारण विभाग,
४७) सर्व कार्यासने, मृद व जलसंधारण विभाग,
४८) जल-८ (निवडनस्ती).